अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 05 फेब्रुवारी 2026 | वर्ष 11 वे | अंक 25 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# कुणबी समाजाने ओबीसी जनगणनेसाठी लढा द्यावा!

## नाना पटोले यांचे कुणबी समाज मेळाव्यात आवाहन



ब्रह्मपुरी/का.प्र.

'कुणबी समाज हा कष्टकरी आणि दुसऱ्याला मदत करणारा समाज आहे. ही देणारी जात आहे, घेणारी नाही. मात्र, सध्याच्या काळात समाजाचा स्वाभिमान टिकवण्यासाठी केवळ शेतीवर अवलंबून न राहता शिक्षण आणि उद्योगात क्रांती करणे ही काळाची गरज आहे, त्याच बरोबर आपले हक्क व अधिकार अबाधित राखण्यासाठी कुणबी समाजाने ओबीसी जनगननेसाठी लढा देणे आवश्यक आहे, त्यामुळे कुणबी समाजाने ओबीसी जनगणनेसाठी आता लढा द्यावा' असे आवाहन महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष तथा आमदार नाना पटोले यांनी व्यक्त केले. ते ब्रह्मपुरी येथे अखिल कुणबी समाज मंडळ व कुणबी समाज संघर्ष समितीच्या वतीने जगद्गुरु तुकाराम महाराज जयंतीनिमित्त आयोजित समाजप्रबोधन व्याख्यान, वधू-वर परिचय मेळावा आणि नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींच्या सत्कार सोहळ्यात ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

अखिल कुणबी समाज मंडळ व कुणबी समाज संघर्ष समितीच्या वतीने जगद्गुरु तुकाराम महाराज जयंतीनिमित्त सकाळी शहरातून संत तुकाराम महाराजांची भव्य पालखी काढण्यात आली, ज्याने अवघे ब्रह्मपुरी शहर 'नामदेव-तुकाराम'च्या जयघोषाने दुमदुमले. तसेच समाजाच्या वतीने समाजप्रबोधन व्याख्यान, वधू-वर परिचय मेळावा आणि नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींच्या सत्कार सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ऋषीजी राऊत होते. मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे युवा प्रवक्ता ऋषभ प्रमोद राऊत उपस्थित होते. तसेच नवनिर्वाचित नगराध्यक्ष योगेश मिसार, दामोदर मिसार संचालक चं.जि.म.स.बँक, डॉ. सतीश दोनाडकर, प्रकाश धोटे, प्रा. देविदास जगनाडे, नानाजी तुपट व अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'वधू-वर परिचय' पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच ब्रह्मपुरी नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष योगेश मिसार यांच्यासह सर्व नवनिर्वाचित

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# अडयाल टेकडी हडपण्याचा प्रयत्न हाणून पाडणार...

## 'भू-वैकुंठ' समितीचा प्रशासनाला खणखणीत इशारा!



ब्रह्मपुरी/का.प्र.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या संकल्पनेतून आणि गीताचार्य तुकारामजी दादांच्या पुढाकारातून साकारलेले आत्मानुसंधान 'भू-वैकुंठ' अड्याळ टेकडी हडपण्याचे कारस्थान काही विघ्नसंतोषी व्यक्तींकडून सुरू आहे. हा प्रकार आम्ही कोणत्याही परिस्थितीत यशस्वी होऊ देणार नाही, असा आक्रमक पवित्रा गुरुदेव भक्त व अनुयायांनी घेतला आहे. ब्रह्मपुरी येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी हा इशारा दिला.

सन १९६७ पासून अड्याळ टेकडीचा निरंतर ताबा व वहिवाट 'भू-वैकुंठ' समितीकडे असल्याचे सिद्ध झाले आहे. नागपूर उच्च न्यायालयाने २ मे २०२५ रोजी समितीच्या बाजूने निकाल देत, खालच्या न्यायालयांचे आदेश रद्द करून तुकाराम दादा प्रणित समितीला कायदेशीर मान्यता दिली आहे. असे असतानाही, काही तथाकथित व्यक्तींनी या परिसरात अवैध खोदकाम करून मोठे खड्डे पाडले आहेत. बांधकामासाठी गिट्टी टाकून अतिक्रमण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. समितीच्या कायदेशीर वहिवाटीत अडथळा निर्माण करण्याचे काम सुरू आहे.

या उपद्रवी व्यक्तींविरुद्ध सात दिवसांच्या आत योग्य ती कायदेशीर कारवाई न झाल्यास, सर्व गुरुदेव भक्त राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीला सर्वस्वी स्थानिक प्रशासन जबाबदार असेल, असेही समितीने स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेला भू-वैकुंठ अड्याळ टेकडीचे संचालक व मार्गदर्शक सुबोध दादा, अध्यक्ष नवलाजी मुळे, कार्याध्यक्ष रेखाताई बुराडे, सचिव लक्ष्मीताई गुरनुले, सदस्य उषाताई नारखेडे, घनश्याम मातेरे, बाबुराव ठवरे यांच्यासह मोठ्या संख्येने गुरुदेव भक्त उपस्थित होते.




## नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात 'अध्यापन-अध्ययनात आयसीटीचा वापर' कार्यशाळा



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात गुणवत्ता हमी कक्ष

(उर्वरित पान क्र. ६ वर)

संपादकीय...

## विलीनीकरणाचा गोंधळ

राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण व्हावे, ही दिवंगत अजित पवार यांची इच्छा होती, असे वक्तव्य ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा कुजबुज सुरू झाली आहे. पण इच्छा आणि वास्तव यात मोठी दरी असते. दादांच्या अकाली निधनानंतर ही दरी भरून काढण्याची ताकद कुणामध्ये आहे, हा खरा प्रश्न आहे. विलीनीकरणाची तुतारी वाजणार की घड्याळाची टिकटिक एकट्यानेच सुरू राहणार, याचे उत्तर अजूनही धूसर आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना १९९९ मध्ये काँग्रेसपासून वेगळे होत शरद पवार, पी. ए. संगमा आणि तारिक अन्वर यांनी केली. त्यानंतर दोन दशकांहून अधिक काळ हा पक्ष महाराष्ट्राच्या सत्ताकारणात निर्णायक ठरला. मात्र २०२३ मध्ये भाजप सरकारमध्ये सामील होण्याच्या मुद्द्यावरून पक्षात उभी फूट पडली आणि दोन राष्ट्रवादी जन्माला आल्या. नाव, चिन्ह आणि वारसा यासाठी न्यायालयात सुरू असलेली लढाई अजून संपलेली नाही. अशा परिस्थितीत विलीनीकरणाचा विचार म्हणजे राजकीय कोड्यात नवा धागा गुंफण्यासारखा आहे. दोन्ही गटात कटुता उरलेली नाही, असा दावा केला जात असला तरी कटुता नसणे आणि एकत्र येणे यात जमिन-अस्मानाचा फरक असतो. महापालिका निवडणुकीत एकत्र येणे ही निव्वळ राजकीय गरज असू शकते. परंतु, विलीनीकरण म्हणजे विचार, नेतृत्व आणि भवितव्य यांचा संगम. हा निर्णय केवळ निवडणुकीच्या अंक गणितावर होत नाही, तर भावनिक आणि वैचारिक समीकरणांवरही अवलंबून असतो. अजित पवार यांच्या निधनानंतर हा धागा अधिक गुंतागुंतीचा झाला आहे.

सहकार, शिक्षण आणि संस्थात्मक बळावर उभे असलेले अनेक आमदार सत्तेशी नाळ जोडून ठेवू इच्छितात. सत्तेशिवाय त्यांची संस्थात्मक गाडी रुळावर राहील का, ही त्यांची चिंता आहे. पण दुसरीकडे शरद पवारांबद्दल सहानुभूती असलेला मोठा वर्ग भाजपपासून अंतर ठेवतो. त्यामुळे विलीनीकरण झालेच, तर भाजपशी जवळीक वाढवायची की अंतर राखायचे, हा प्रश्न अधिक तीव्र होईल. हीच खरी राष्ट्रवादीसमोरील राजकीय कसोटी आहे.

भाजपची भूमिका येथे निर्णायक ठरू शकते. गेल्या दशकात राष्ट्रवादी आणि भाजप एकत्र येण्याचे प्रयत्न चार वेळा झाल्याचे सांगितले जाते, जरी अधिकृत दुजोरा कोणी देत नाही. सत्तेच्या गणितात वैचारिक भिंती सहज कोसळतात, हे भारतीय राजकारणाने वारंवार दाखवून दिले आहे. विलीनीकरण झाल्यास केंद्रात भाजपला बळ मिळेल, तसेच विरोधकांच्या इंडिया आघाडीला मानसिक धक्का बसेल, हेही स्पष्ट आहे. महाराष्ट्रात काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना हेच प्रमुख विरोधक उरतील, अशी शक्यता नाकारता येत नाही. या सर्व घडामोडींमध्ये सुनेत्रा पवार यांची भूमिका केंद्रस्थानी येते. उपमुख्यमंत्रीपद त्यांच्या हाती आले असून पक्षाचे नियंत्रणही मोठ्या प्रमाणात त्यांच्याकडे झुकले आहे. अजित पवार यांनी भाजपबरोबर सत्तेत राहूनही आपली वैचारिक ओळख पूर्णपणे गमावली नव्हती. तीच समतोल साधण्याची कसरत आता सुनेत्रा पवार यांच्यासमोर आहे. जिल्हा परिषद निवडणुकांचे निकाल आणि पश्चिम महाराष्ट्रातील पक्षाची ताकद यावर त्यांच्या नेतृत्वाची पहिली खरी परीक्षा होईल.

राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र येईल का? उत्तर सरळ नाही. कारण हा निर्णय केवळ राजकीय नाही, तर पवार कुटुंबाच्या अंतर्गत समन्वयाचा आणि कार्यकर्त्यांच्या भावनेचाही आहे. तुतारीचा नाद एकतेचा संदेश देईल की घड्याळाची टिकटिक स्वतंत्र अस्तित्व जपेल, हे येणारा काळ ठरवेल. महाराष्ट्राच्या राजकारणातील हे प्रकरण केवळ पक्षीय नाही, तर सत्तेच्या आणि विचारांच्या संघर्षाचे प्रतीक बनले आहे.

# ब्रम्हपुरीत मंथन सामान्य ज्ञान परीक्षा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

विद्यार्थ्यांची शिक्षण पंढरी म्हणून ओळख असलेल्या ब्रह्मपुरी ब्रम्हपुरी येथील परीक्षा केंद्रावर अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडलेल्या या



शहरातील नेवजाबाई हितकारिणी मुलांचे विद्यालय येथे मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षा संपन्न झाली. या केंद्रावरून यावर्षी विक्रमी तब्बल १२०० विद्यार्थ्यांनी परीक्षा देत स्पर्धात्मक भविष्यासाठी आत्मविश्वासाने पाऊल पुढे टाकले आहे. मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षा २०२६ रविवार, दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी संपूर्ण राज्यभर एकाचवेळी संपन्न झाली.

परीक्षा केंद्राला ब्रह्मपुरी शहरातील उद्योगपती, शिक्षणप्रेमी तथा नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया, माजी गट शिक्षणाधिकारी माणिक खुणे साहेब, तसेच एल. एम. बी. पब्लिक स्कूल, ब्रह्मपुरी च्या डायरेक्टर आशिता भैया मॅडम, नेवजाबाई हितकारिणी बॉईज विद्यालयाचे प्राचार्य नाईक सर आदी मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली. त्यांनी अत्यंत नियोजनबद्ध, शिस्तबद्ध व पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत असलेल्या परीक्षा व्यवस्थेचे मन:पूर्वक कौतुक करत आयोजक व व्यवस्थापकांचे अभिनंदन केले.

यावेळी अशोक भैया यांनी मंथन वेल्फेअर संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या स्पर्धात्मक गुणवत्ता विकासासाठी सुरू असलेल्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. अशा परीक्षांमुळे चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा तसेच गोंदिया या पूर्व महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची दिशा, आत्मविश्वास आणि यशाची प्रेरणा मिळते, असे मत त्यांनी व्यक्त केले. शिस्त, गुणवत्ता आणि पारदर्शकतेचा आदर्श ठेवत ही संपूर्ण परीक्षा शांततापूर्ण व अत्यंत यशस्वीरीत्या पार पडली. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी असे उपक्रम निश्चितच मार्गदर्शक ठरणार आहेत.

# स्व. अजितदादा पवार यांना सर्वपक्षीय आदरांजली




ब्रम्हपुरी/का.प्र.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे विमान अपघातामध्ये झालेले आकस्मिक निधन ही संपूर्ण देशासाठी, महाराष्ट्रासाठी व आपल्या सर्वांसाठी भरून न निघणारी हानी आहे. या महान नेत्यास सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौकात उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांना आदरांजली वाहिली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ब्रम्हपुरी शहर व तालुका पदाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने तालुक्यातील सर्वपक्ष तसेच सर्व सामाजिक संघटनाचे नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

सदर शोकसभेत मान्यवरांनी अजितदादा सोबतच्या असलेल्या आठवणींना उजाळा दिला. असा नेता पुन्हा होणे नाही म्हणून प्रत्येक जन हळहळ व्यक्त करीत होता. सदर शोकसभा प्रा.देविदासजी जगनाडे सर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी प्रामुख्याने माजी आमदार अतुल देशकर, जिल्हा बँकेचे संचालक दामोधरजी मिसार, तालुका काँग्रेस चे अध्यक्ष खेमराजजी तिडके, गौरव भेंडारकर, खोरीपाचे नेते जीवनजी बागडे, शहर अध्यक्ष प्रशांत डांगे, माजी उपाध्यक्ष न.प अशोकजी रामटेके, माजी सभापती न.प दिपकजी शुक्ला, भाजपा नेते प्रा.प्रकाशजी बगमारे, सुयोग बाळबुद्धे, अशोक सालोटकर, राजुजी भागवत, उबाटा सेनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वरजी बगमारे, उपजिल्हा प्रमुख प्रा.अमृत नखाते, राहुल सोनटक्के, राष्ट्रवादीचे अविनाश राऊत नगरसेवक, विनोद नवघडे, किशोर भोयर, नोगेश बगमारे, गिरीधर गुरपुडे, अश्विन उपासे, मंगेश फटिंग, रामकृष्ण राऊत, मार्तंडजी गहाणे सर, दिपकजी डेंगे, विक्की मेहता, नौशाद सय्यद, मनोज कऱ्हाडे, तिलकजी तिघरे, मनोज वझाडे, सचिन मेश्राम, हरिभाऊ प्रधान, सरदार मिर्झा बेग, गोवर्धनजी दोनाडकर, निहाल ढोरे, मनीषा उमक, अर्चना धोंगळे, शालिनी धोंगळे, रेखा तिघरे, इमराना बेग अन्सारी आदी असंख्य अजितदादा प्रेमी उपस्थित होते.

❀❀❀❀❀❀

## विनोदिनी

मुलगी : पप्पा तुम्हांशी खूप महत्त्वाचं बोलायचं होतं...'

वडील : बोल ना..!

मुलगी : मी एका मुलावर प्रेम करते; पण तो अमेरिकामध्ये राहतो.. आमची "Website"मुळे ओळख झाली.. 'Facebook' मुळे मैत्री झाली... 'Skype'मुळे त्याने मला 'Propose' केले. 'Whatsapp'मुळे दोन वर्षा-पासून प्रेम चालू आहे!'

वडील : खरंच...! मग आता Twitter वर लग्न कर आणि 'YouTube' वर पोस्ट कर... 'Make my trip' मध्ये हनिमून कर... 'Flipkart' ने मुले मागवा... 'e-mail'मध्ये 'receive' करा ... आणि शेवटी जर 'Husband' आवडला नाही, तर "OLX" वर विकून टाक...!!

# देसाईगंज बसस्थानकाचे काम कासवगतीने; प्रवाशांचा जीव टांगणीला!

## मुख्य रस्त्यावर बसेसच्या रांगा, अपघातांचे सत्र वाढले, प्रशासन-लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

देसाईगंज/प्रतिनिधी

जिल्ह्यातील एकमेव व्यापारी केंद्र आणि रेल्वे स्थानक असलेले महत्त्वाचे शहर म्हणून देसाईगंजची ओळख आहे. आरमोरी विधानसभा क्षेत्रातील या मोठ्या शहरात गेल्या पाच वर्षांपासून बसस्थानकाचे बांधकाम सुरू आहे. मात्र, हे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने सध्या शहरात वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, सर्वसामान्य नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.



बसस्थानकाचे काम रखडल्यामुळे बसेस मुख्य रस्त्यावरच उभ्या केल्या जातात. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी बसेस उभ्या राहत असल्याने प्रवाशांना चालण्यासाठी जागा उरत नाही. विशेषतः शाळा सुटल्यानंतर ग्रामीण भागातील विद्यार्थी बस पकडण्यासाठी जीवघेणी धावपळ करतात. यात एखाद्या वेळी मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. देसाईगंज हे चंद्रपूर, नागपूर आणि गोंदिया या मोठ्या शहरांच्या मध्यभागी असल्याने येथे मोठी वाहतूक असते. त्यातच सुरजागडवरून येणाऱ्या अवजड ट्रकमुळे शहरात अपघातांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. अनेक निष्पाप नागरिकांना या अपघातात आपले प्राण गमवावे लागले आहेत. ही परिस्थिती पाहता, भविष्यातील मोठा अनर्थ टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

### सरकारी योजना केवळ कागदावर

राज्य सरकारने महिला आणि ज्येष्ठांसाठी बस प्रवासात सवलतींच्या विविध योजना सुरू केल्या आहेत. मात्र, देसाईगंजसारख्या महत्त्वाच्या शहरातून उपराजधानी नागपूरसाठी थेट बस सेवा उपलब्ध नाही. 'जर बसच उपलब्ध नसेल, तर या योजनांचा फायदा काय?' असा संतप्त सवाल स्थानिक जनतेकडून विचारला जात आहे. 'गेल्या पाच वर्षांपासून आम्ही केवळ आश्वासने ऐकत आहोत. प्रशासनाने आणि लोकप्रतिनिधींनी कंत्राटदाराला कामाची गती वाढवण्याचे आदेश द्यावेत आणि देसाईगंजला सुसज्ज बसस्थानकासह दर्जेदार बस सेवा त्वरित उपलब्ध करून द्यावी.' अनेकदा तक्रारी करूनही अधिकारी आणि लोकप्रतिनिधी याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. आता तरी प्रशासन या निद्रेतून जागे होऊन बसस्थानकाचे काम पूर्ण करणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# डॉ. धनराज खानोरकरांच्या 'सिमग्याच्या बोंबा अन् चवरीच्या सेंगा' काव्यसंग्रहाचे लोकार्पण

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील प्रसिद्ध कवी, लेखक, पत्रकार व नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख डॉ.धनराज खानोरकर यांचे अस्सल झाडी बोलीतील विनोदी काव्यसंग्रह 'सिमग्याच्या बोंबा अन् चवरीच्या सेंगा' या काव्यसंग्रहाचा लोकार्पण सोहळा नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाच्या स्व.हिरालाल भैया सभागृहात नुकताच पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर तथा शासकिय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ.राजन वानखडेंच्या हस्ते व डॉ रेखा मेश्राम, डॉ मोहन कापगते, डॉ भास्कर लेनगुरे, डॉ अरविंद मुंगोले, डॉ वर्षा चापके, प्रा.रुपेश वाकोडीकरांच्या उपस्थितीत पार पडला.



सदर कवितासंग्रह मुंबईच्या संधीकाल प्रकाशनाने प्रकाशित केला असून झाडीबोली महर्षी डॉ हरिश्चंद्र बोरकरांनी पुस्तकाचे वेस्टन आणि नाशिकचे समीक्षक डॉ तुषार चांदवडकरांची प्रस्तावना याला लाभलेली आहे. हे डॉ खानोरकरांचे पाचवे कवितासंग्रह असून बहुचर्चित 'संजोरी' व चार संपादित ग्रंथ त्यांच्या नावावर जमा आहेत. या लोकार्पण सोहळ्याला महाविद्यालयाचे समस्त प्राध्यापक व रसिक उपस्थित होते. संचालन डॉ मोहन कापगते तर उपस्थितांचे आभार डॉ भास्कर लेनगुरेंनी मानले.

# तोरगाव खुर्द येथे तालुकास्तरीय बालक्रीडा स्पर्धा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तोरगाव खुर्द येथे तालुका स्तरीय शालेय बालक्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला. या सर्धेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष कृष्णा सहारे यांच्या हस्ते, गट विकास अधिकारी रवींद्र घुबडे यांच्या अध्यक्षतेखाली, तर ब्रम्हपुरी नगर परिषद अध्यक्ष योगेश मिसार, सरपंच शरद अलोणी, नरेश देशमुख, डॉ. विद्या शेळकी, विस्तार अधिकारी गायत्री तोराम, ग्रामविकास अधिकारी मंगेश गोवर्धन, केंद्रप्रमुख वाळके मॅडम, डांगे मॅडम, बोरकुटे सर, बुराडे सर, धनराज भोयर, पठाण सर,अनंत भोयर, यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

ब्रम्हपुरी तालुक्यातील पाचही बीटा तील खेळाडू सहभागी झाले होते. अशा स्पर्धेतून विद्यार्थ्यांचा विकास होऊन त्यातील कला गुण प्रदर्शित होतात, असे प्रतिपादन उद्घाटक कृष्णा शहारे यांनी व्यक्त केले. मान्यवरांनी समोपचीत मार्गदर्शन केले. विविध शाळांनी दार्शनिक कवायती सादर केल्यात. प्रास्ताविक गट शिक्षण अधिकारी शेळके मॅडम यांनी केले. नगराध्यक्ष योगेश मिसार,यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकाचा सत्कार करण्यात आला.

# ब्रम्हपुरीत गणराज्य दिन बुद्धिबळ स्पर्धा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. २६जानेवारी २०२६ ला भारताच्या ७७ व्या गणराज्यदिनानिमित्य ब्रम्हपुरी तालुका बुद्धिबळ संघटना ब्रम्हपुरी च्या वतीने 'स्व.केवळरामजी राऊत स्मृती गणराज्य दिन बुद्धिबळ स्पर्धा -२०२६'चे भव्य आयोजन स्वागत मंगल सभागृह , ब्रम्हपुरी येथे करण्यात आले. स्पर्धेत एकूण १२७ खेळाडूंनी भाग घेतला. स्पर्धेचे प्रयोजक सचिन राऊत नगरसेवक ब्रम्हपुरी तर्फे १५हजार रुपयाचे रोख बक्षीस व प्रोत्साहन पुरस्कार होते. स्पर्धेचे



उदघाटन BTCAचे सचिव हरिश्चंद्र चोले व पदाधिकारी यांचे हस्ते करण्यात आले. ओपन गटातील ६ व विद्यार्थी गटातील ७ फेऱ्या पूर्ण करून सायंकाळी स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला.

ओपन गटात-हर्षल भानारकर प्रथम, उमेश सहारे द्वितीय ,व कंकम कुमार तृतीय, तसेच विद्यार्थी गटात – शिवम राठी प्रथम, ओजस भोयर द्वितीय, कनिष्क इंदुरकर तृतीय अशाप्रकारे विजयाचे मानकरी ठरले. दोन्हीही गटात पुरस्कार व ट्रॉफी देऊन खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. बक्षिस समारंभाचे अध्यक्ष योगेशजी मिसार नगराध्यक्ष नगर परीषद ब्रम्हपुरी, बक्षीस वितरक व प्रमुख मार्गदर्शक भाऊराव राऊत माजी मुख्याध्यापक , तसेच प्रमूख अतिथी म्हणून सचिनभाऊ राऊत नगरसेवक, मोन्टू पिलारे नगरसेवक, खेमराजजी तिडके, अमिताभ नागमोती, वकार साहेब नगरसेवक, यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून बक्षीस वितरण केलेत. स्पर्धा संयोजक आदित्य दुफारे, मुख्य ऑरबिटर रितेश उरकुडे, निलेश बांडे, प्रकाश वैद्य, मुकुल सयाम, मुकूल बरडे तसेच वेदांत बांडे यांनी योग्य नियोजन करून स्पर्धा यशस्वी केली.

अतिथी परिचय व प्रास्ताविक, दशरथ बांडे अध्यक्ष BTCA यांनी केले तर संजय देव सर यांनी संचालन व तुळशीरामजी सपाटे यांनी आभार प्रदर्शन केले. प्रसंगी हरिश्चंद्रजी चोले संस्थापक सचिव, माजी प्रा.सतीश शिनखेडे, मुनिराज कुथे, महादेवजी दर्वे, दामोधर बावनकुळे, प्रा.सुयोग बाळबुद्धे, विनोबाजी मेश्राम, प्रा.मोतीलाल दर्वे, झुबेर रय्यानी, उत्तम कोसे, प्रा. मनिषा गेडाम, गजानन समर्थ, आकाश खंडाळकर, जावेद पोटीयावाला उपस्थित होते.

# राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेत नागपूरचा ईगल संघ अव्वल तर ब्रम्हपुरी संघ द्वितीय

## ब्रम्हपुरी येथे राज्यस्तरीय हॉकी स्पर्धा संपन्न




ब्रम्हपुरी/का.प्र.

येथे हॉकी असोसिएशन द्वारा आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय हॉकी स्पर्धा आमदार चषक स्पर्धेचा अव्वल विजेता संघ ईगल हॉकी क्लब नागपूर ठरला आहे. या विजेत्या संघाला ५१ हजार रुपये व आकर्षक चषक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे. द्वितीय पारितोषिक ब्रम्हपूरी हॉकी असोसिएशन संघाने तर तृतीय पारितोषिक रिपब्लिकन संघ मुंबई संघाने पटकावले आहे. या स्पर्धेतील सर्व रोख बक्षिसे महाराष्ट्र विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते तथा ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार यांच्या कडून प्रायोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतुन ३२ संघांचे ६५० खेळाडू सहभागी झाले होते.

ज्युनिअर बॉईज वयोगटातील प्रथम पारितोषिक ब्रम्हपूरी हॉकी असोसिएशन ए टीमने पटकावले. तर द्वितीय पारितोषिक अंजनी हॉकी संघ नागपूर यांनी व तृतीय पारितोषिक ब्रम्हपूरी हॉकी असोसिएशन बी टीम यांनी पटकावले. मुलींच्या स्पर्धेचा प्रथम पारितोषिक ऐरम नागपूर संघाने पटकावले. द्वितीय पारितोषिक गडचिरोली संघाने व तृतीय पारितोषिक प्रबोधीनी हॉकी संघ छत्रपती संभाजीनगर यांनी पटकावले आहे.

यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ नागरिक संघटना अध्यक्ष प्रा.सुभाष बजाज हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ देविदास जगनाडे, प्राचार्य डॉ.देवेश कांबळे, शहर काँग्रेस अध्यक्ष हितेंद्र राऊत, न.प.नियोजन सभापती सचिन राऊत, नगरसेवक मोंटु पिलारे, आंतरराष्ट्रीय हॉकीपटू कॉनराय रेमोडीओस, कार्यालय प्रमुख सुधीर पंदीलवार यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक किशोर वानखेडे व निनाद गडे यांनी यांनी केले. तर सुत्रसंचलन सुरज मेश्राम यांनी तर आभारप्रदर्शन निनाद गडे यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी ब्रम्हपूरी हॉकी असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

# धानाचे चुकारे रखडल्याने शिवसेना (उबाठा) आक्रमक

ब्रम्हपुरी/का.प्र

ऑक्टोबर महिन्यापासून खरेदी केंद्रावर विक्री केलेल्या धानाचे पैसे (चुकारे) अद्याप न मिळाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. या गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मुख्यमंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री आणि कृषी मंत्र्यांच्या नावे उपविभागीय अधिकारी/तहसीलदार, ब्रम्हपुरी यांना निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.


फेडरेशनमध्ये विक्री केलेल्या धानाचे थकीत पैसे तात्काळ देण्यात यावेत. शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक थांबवून त्यांना बोनस जाहीर करावा. प्रशासनाने या प्रक्रियेत गती आणून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. या प्रमुख मागण्यांसाठी शिवसेना उबाठा च्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी निवेदनाद्वारे स्पष्ट करण्यात आले की, जर मागण्यांची पूर्तता त्वरित झाली नाही, तर शिवसेना (उबाठा) स्टाईलने तीव्र आंदोलन करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा दमही निवेदनातून देण्यात आला.

प्रसंगी शिवसेना (उबाठा) चे प्रा. अमृत वि. नखाते (उपजिल्हा प्रमुख, चंद्रपूर), डॉ. रामेश्वर राखडे (विधानसभा प्रमुख, ब्रम्हपुरी), प्रा. ज्ञानेश्वर बगमारे (तालुका प्रमुख, ब्रम्हपुरी), राजेश्वर दुपारे, शामराव भानारकर, चक्रधर दाणी, सुमंत वैरागडे, निनानंद ढोरे, गणेश बागडे, किशोर टेकाम, किरण राऊत, धनपाल विधाते यांच्यासह शेतकरी बांधव भास्करजी नाकतोडे, प्रा. ओमप्रकाश ढोरे, सुधीरभाऊ शिवुरकर, विनोद बुल्ले, भोजराज नंदागवळी यांचेसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाकपच्या रास्ता रोको व चक्का जाम आंदोलनाला यश

ब्रह्मपुरी/का.प्र.

गांगलवाडी ते व्याहाड रस्ता जलद गतीने पूर्ण करा. मेन



रोडचे खड्डे त्वरित बुजवा, हायवा ट्रकने होणारी जड वाहतूक थांबली पाहिजे, मुडझा ते गांगलवाडी रस्त्यावर नियमित पाणी मारा, मेन रोडच्या उडणाऱ्या धुळीमुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाले आहे, त्यांना नुकसान भरपाई मदत द्यावी, गांगलवाडी मूडझा आवळगाव येथील शालेय विद्यार्थ्यांना (ब्रह्मपुरी आगारातून) ब्रह्मपुरी ते मुडझा करिता बस फेऱ्या वाढवा. या सह अन्य प्रलंबित मागण्यांना घेऊन रविवार दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ दुपारी १२:०० वाजता गांगलवाडी टी पॉईंट जवळ भारतीय कम्युनिस्ट पक्ष तालुका कौन्सिल ब्रह्मपुरीच्या वतीने भव्य चक्काजाम आंदोलन करण्यात आले.

प्रशासनाने रास्ता रोको आंदोलन अधिक तीव्र होऊ नये म्हणून खबरदारी घेतली. वेळीच प्रशासनातर्फे नायब तहसीलदार बोभाटे तर रोडचे कंत्राटदार मिश्रा यांनी ब्रह्मपुरी ते ठाणेदार प्रमोद बांनबले यांच्या मध्यस्थीने रास्ता रोको आंदोलन शांततेत पार पाडले. यावेळी मुख्य चक्काजाम आंदोलनासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते विनोद झोडगे , डॉ.महेश कोपुलवार, ॲड. जगदीश मेश्राम यांच्या नेतृत्वात पार पडला. विनोद झोडगे स्वत: पुढाकार घेऊन त्यांनी सबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. दिलेल्या मुदतीत मागण्या पूर्ण न झाल्यास उपोषणाच्या माध्यमातून लढा देणार असल्याचे मत यावेळी व्यक्त केले.

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये 'Good Touch, Bad Touch' कार्यशाळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या वर्ग १ ते ५ वी च्या विद्यार्थ्यांकरिता Good




Touch, Bad Touch Workshop हा कार्यक्रम दि. २१ जानेवारी २०२६ रोज बुधवारला घेण्यात आला. आजच्या काळाची गरज म्हणून मुला-मुलींना चांगला स्पर्श किंवा वाईट स्पर्श हा ओळखता यावा म्हणून विद्यार्थ्यांना उपरोक्त विषयाची माहिती या दिवशी देण्यात आली. याद्वारे मुले आपले संरक्षण करू शकतात व त्यांच्या जीवनात होऊ घातलेल्या एखाद्या दुर्दैवी घटनेला आळा बसावा म्हणूनच अशा वर्कशॉपचे आयोजन दरवर्षी करून मुलांना जागरूक करण्यात येते.

यावेळी मुलांना शिक्षिकांनी जिवनातील छोटे-छोटे उदाहरण घेऊन तसेच विद्यार्थ्यांच्या दैनंदिन दिवसात घडणाऱ्या घटना यांचे नाटकाच्या माध्यमातुन प्रात्याक्षिक करून त्यांना चांगला स्पर्श व वाईट स्पर्श यातील फरक समजावून दिला. तसचे ॲनिमेटेड विडिओ द्वारे देखील याविषयाचे ज्ञान देण्यात आले. यावेळी १ ते ५ वी च्या विद्यार्थ्यांना स्वत:चे रक्षण कसे करावे व त्याचा प्रतिकार कसा करावा तसेच अशा घटनेविषयी आपल्या पालकांना शिक्षकांनास या बाबतीत सुचित करावे हे देखील सांगण्यात आले. एल. एम. बी स्कुल मुलांना विविध विषयांचे ज्ञान देण्यासाठी वेगवेगळ्या कार्यशाळेचे आयोजन नेहमीच करीत असते.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबर समाजात वाढत असलेल्या वाईट कृतीला आळा घालण्यासाठी तसेच त्या वाईट कृतीतून सुरक्षीत बाहेर कसे पडता येईल याबाबत एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये Good Touch, Bad Touch Workshop च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संरक्षणाचे धडे देण्यात आले. यावेळी एल. एम. बी. स्कुलच्या संचालिका मॅडम आशिता भैया, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी आणि पर्यवेक्षिका रश्मी झोडे यांनी उपस्थिती दर्शविली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# लेखी आश्वासनानंतर प्रशांत डांगे यांच्या उपोषणाची सांगता




ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी-वडसा मार्ग आणि ब्रह्मपुरी-आरमोरी महामार्गावरील रखडलेल्या उड्डाणपुलाच्या कामाविरोधात पुकारलेल्या संघर्षाला मोठे यश आले आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रशांत डांगे यांनी प्रशासनाच्या संथ कारभारावर ताशेरे ओढत सुरू केलेले आमरण उपोषण, राष्ट्रीय महामार्ग विभागाने मागण्या पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर अखेर मागे घेण्यात आले. माजी आमदार अतुल देशकर यांच्या हस्ते नारळ पाणी घेऊन प्रशांत डांगे यांनी उपोषण सोडले.यावेळी माजी आमदार प्रा. अतुल देशकर, डॉ. देवेश कांबळे आणि डॉ. राजेश कांबळे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

केवळ पोकळ आश्वासनांवर समाधान न मानता, कामाचा दर्जा आणि गती याबाबत ठोस भूमिका घेण्याची मागणी डांगे यांनी लावून धरली होती. अखेर, राष्ट्रीय महामार्गाचे उपकार्यकारी अभियंता लिंगावार यांनी नागरिकांच्या सर्व मागण्या पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले. उड्डाणपुलाचे काम तातडीने युद्धपातळीवर पूर्ण करणे. कामाच्या निकृष्ट दर्जाबाबत चौकशी करून सुधारणा करणे. अपघात टाळण्यासाठी तात्काळ सूचना फलक आणि संरक्षक उपाययोजना करणे या मागण्याचा प्रामुख्याने समावेश आहे.

# राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्य हुतात्मा दिनाचे आयोजन

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला, येथे दि.३० जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आणि महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ७८व्या पुण्यतिथी निमित्त हुतात्मा दिनाचे आयोजन करण्यात आले.

प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सचिन दुधे आणि राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन, डॉ.सुहास साकरकर, डॉ.अनुप बारसागडे यांनी महात्मा गांधींच्या प्रतिमेचे पुष्प हार आणि पुष्प सुमने अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या वेळेस महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक गण शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्प हार व फुले अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनि भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी केलेल्या कार्याचे आणि लढ्याचे गुणगौरव केले. कार्यक्रमाचे आयोजन व आभार प्रदर्शन रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन यांनी केले.

# शेतकऱ्यांच्या धान चुकाऱ्याची रक्कम तात्काळ जमा करा

## ब्रम्हपुरी काँग्रेसची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनातून मागणी



ब्रम्हपुरी/का.प्र.

सन २०२५-२६ या वर्षातील खरीप हंगामात ब्रम्हपुरी तालुक्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांकडून मार्केटिंग फेडरेशनद्वारे शासकीय आधारभूत किंमतीने खरेदी केलेल्या धानाचे चुकारे प्रलंबित आहेत. तरी शेतकऱ्यांच्या प्रलंबित धानाच्या चुकाऱ्याची रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी यासाठी ब्रम्हपुरी काँग्रेसच्या वतीने तहसीलदार यांच्या मार्फतीने मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे.

धान खरेदीच्या देयकांमध्ये होणाऱ्या विलंबामुळे शेतकरी चिंतेत आहेत. ब्रम्हपूरी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी धानाचे भरघोस पीक घेतले. शेतकऱ्यांनी सदर धान हे ब्रम्हपूरी तालुक्यातील विविध शासकीय धान खरेदी केंद्रांवर विकले आहेत, परंतु या धानाचे पैसे प्रलंबित आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून शासनाने धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने पाऊल उचलून धानाच्या प्रलंबित चुकाऱ्यांची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करावी अशी मागणी निवेदनाद्वारे काँग्रेसने केली आहे.

निवेदन देताना तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत यांसह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वाचाल तर वाचाल..**

# रात्रकालिन कबड्डी महासंग्रामचे उत्कृष्ट आयोजन

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील मौजा तोरगांव बुज. येथे छत्रपती शिवाजी राजे क्रीडा मंडळ यांचे वतीने ५८ किलो वजन गट रात्रकालीन कबड्डी महासंग्राम चे दिनांक २८ ते ३० जानेवारी २०२६ ला आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सुधीर शिवरकर माजी उपसरपंच तोरगाव बूज. उपस्थित होते. स्पर्धेचे उद्घाटन योगेश राऊत माजी सरपंच तोरगाव बूज. यांचे हस्ते पार पडले. प्रसंगी मंचावर उपाध्यक्ष म्हणून अमित बनकर कालेता, विनोद बुल्ले माजी सरपंच बेलगाव, नुतन प्रधान उपसरपंच कोलारी, मनोहरजी मेश्राम माजी सरपंच तोरगाव बूज., दीपकजी राऊत, झिंगर राऊत अध्यक्ष सेवा सहकारी सोसायटी तोरगांव बूज., श्रावणी राऊत, किशोर नखाते अध्यक्ष तमुस तोरगांव बूज., सोमेश्वर राऊत पो. पाटील तोरगांव बूज. गजानन राऊत धान्य व्यापारी, दीक्षांत सुखदेवे कोतवाल, भाऊराव वलथरे, कैलास रुईकर ,नानाजी गडे, दिनेश तुपटे बेलगांव उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन धर्मेंद्र रामटेके यांनी केले. यावेळी तोरगांव बूज. येथील नागरिक व कबड्डी खेळाडू मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# भाजपचा मोतीबिंदू रूग्णांकरीता दिलासादायक उपक्रम

## तनय देशकर यांच्या पुढाकाराने रूग्णांची ८ वी बस रवाना

ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने व भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तनय देशकर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया उपक्रमांतर्गत पात्र रुग्णांची ८ वी बस आज नागपूरकडे रवाना झाली. या उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत २०० हून अधिक रुग्णांची यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली असून, अनेक गरजू



रुग्णांना नवदृष्टी मिळाली आहे. आर्थिक अडचणींमुळे उपचार घेऊ न शकणाऱ्या ग्रामीण भागातील नागरिकांसाठी हा उपक्रम मोठा आधार ठरत आहे.

रुग्णांची तपासणी, नागपूरपर्यंतचा प्रवास, शस्त्रक्रिया व आवश्यक वैद्यकीय सेवा पूर्णत: मोफत उपलब्ध करून देण्यात येत असून, सामाजिक बांधिलकी जपत भाजपाचा हा उपक्रम आदर्श ठरत आहे. तनय देशकर यांच्या संवेदनशील नेतृत्वामुळे हा उपक्रम ग्रामीण भागातील जनतेसाठी विश्वासार्ह आणि प्रभावी ठरला आहे.

मुडझा, कुडेसावली व मुरपार येथील पात्र रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नागपूरला रवाना झाले. या प्रसंगी प्रामुख्याने भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस तनय देशकर, माजी सरपंच घनशामजी तोमटी, जिल्हा सचिव साकेतजी भानारकर, भुजंगजी राऊत, तालुका सचिव अभयजी कुथे, बंडूभाऊ कोटगले, मोरेश्वरजी दडमल, गोपीनाथजी मोरांडे, अमोलजी इटनकर, यशवंतभाऊ चिमुरकर, शुभमभाऊ तोमटी, धनराजजी सातपुते, यशवंत देशमुख यांच्या सह भाजपा कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

**... QUOTES ...**

"Perfection is not attainable, but we chase perfection we can catch excellence."

- Vince Lombardi

**चारोळी**

रागात तप्त असता तेव्हा
कोणताही निर्णय घेऊ नका...
चैनीत गाफिल असता तेव्हा,
कोणतेही वचन देऊ नका...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# "१०वी नंतर काय?" या विषयावर मार्गदर्शन

## एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये विद्यार्थ्यांकरीता सेमिनारचे आयोजन






ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करून इयत्ता दहावी नंतर करिअर निवडतांना विद्यार्थ्यांची आवड कौशल्य आणि भविष्यातील ध्येय यावर लक्ष केद्रित करणे महत्वाचे आहे हे जाणून एलएमबी पब्लिक स्कुलद्वारे शाळेतील १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी दि. २२ डिसेंबर २०२५ ला मार्गदर्शन परिसंवाद ठेवण्यात आला. मार्गदर्शनासाठी नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाचे प्रा. प्रफुल पराते सर यांना आमंत्रित केले.

प्रा. प्रफुल पराते सरांनी मुलांना सुरूवातीला प्रश्न विचारले आणि आपल्या मार्गदर्शनाला सुरूवात केली. मुलांनी अभ्यास कसा करावा? कोणत्या पद्धतीने करावा? किती वेळ अभ्यासाला दिला पाहिजे? ह्या सर्व गोष्टी त्यांनी स्वत: घडवलेल्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सांगितले. असे किती तरी विद्यार्थी त्यांनी घडविलेले आहेत. जी आज ते उच्च पदावर आहेत आणि त्यांना त्या विद्यार्थ्यावर अभिमान आहे. मनात जिद्द असली की कुठलेही क्षेत्र गाठता येते हे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी स्टेट बोर्ड घ्यावे की सीबीएसई बोर्ड घ्यावा या बद्दल ही मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना अभ्यासात असलेला संभ्रम त्यांनी दुर करून पुढील शिक्षणासाठी सीबीएसई बोर्ड किती महत्वाचा आहे हे सांगितले. अजुनही वेळ गेलेली नाही. अभ्यासाला सुरूवात करा. चांगल्या गुणांनी पास व्हा, जिद्द मनात ठेवून उच्च ध्येय गाठा असा संदेश मुलांना त्यांनी दिला.

कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य कुरेशी सर उपप्राचार्य इयत्ता १० वी चे शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.






# चिखलगाव शाळेत 'सांस्कृतिक संध्या'

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील जि. प. उच्च प्राथमिक शाळा चिखलगाव येथे दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी 'सांस्कृतिक संध्या' हा दिमाखदार सोहळा पार पडला. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे आणि लोकसहभागातून शाळेच्या शैक्षणिक विकासासाठी आर्थिक हातभार लावणे या दुहेरी उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन ख्रिस्तानंद हॉस्पिटल ब्रह्मपुरीचे फादर कुरियन यांच्या हस्ते पार पडले. अध्यक्षस्थानी पिंपळगाव भोसलेचे माजी सरपंच सुनील धांडे हे होते, तर उपाध्यक्ष म्हणून मोरेश्वर दर्वे उपस्थित होते. या प्रसंगी विशेष अतिथी म्हणून भास्करराव नाकतोडे, प्रेमलाल धोटे, उमाजी कुथे माजी जि.प. सदस्य चंद्रपूर, भोजराज नंदागवळी सरपंच लाडज, प्रतिभाताई सरपंच चिखलगाव, विनायक राऊत उपसरपंच, अरून पिसे बीट जमादार, जगदीश मेहर सर, पुष्पलताताई बुराडे, नरेंद्र दुपारे, विद्यार्थ्यांचे पालक व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात...

(पान क्र. १ वरून)

(आय.क्यू.ए.सी)च्या वतीने 'यूज ऑफ आय.सी.टी इन टीचिंग-लर्निंग' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. महाविद्यालयातील स्व. हिरालालजी भैया परिषद सभागृहात संपन्न झाली.

या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून शासकीय पॉलिटेक्निक, ब्रम्हपुरीचे प्राचार्य डॉ.राजन एल. वानखडे उपस्थित होते. त्यांनी अध्यापन प्रक्रियेत माहिती व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, डिजिटल साधने, ऑनलाईन संसाधने तसेच आधुनिक शिक्षणपद्धती याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष शेकोकर होते. विचारपीठावर डॉ.रेखा मेश्राम वाणिज्य विभागप्रमुख तसेच डॉ.वर्षा चापके उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संयोजक म्हणून डॉ.बी.एल. लेनगुरे, वाणिज्य विभाग यांनी जबाबदारी पार पाडली. समन्वयक डॉ.के.एस. नाकतोडे व सहसमन्वयक डॉ. ए.जे.मुंगोले यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

संचालन प्रा.रुपेश वाकोडीकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ लेनगुरे यांनी केले. कार्यशाळेला महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थिती होते. कार्यक्रमामुळे अध्यापन अधिक प्रभावी व विद्यार्थीकेंद्रित करण्यासाठी आयसीटीच्या वापराबाबत प्राध्यापकांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

पाणी अडवा, पाणी जिरवा...

# कुणबी समाजाने ओबीसी जनगणनेसाठी...

(पान क्र. १ वरून)

नगरसेवकांचा आणि विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा जाहीर सत्कार करण्यात आला. पुढे कार्यक्रमात मार्गदर्शन करताना नाना पटोले यांनी जातीनिहाय जनगणनेच्या मुद्द्यावर विशेष भर दिला. ते म्हणाले की, केंद्र सरकारने जनगणनेतून ओबीसींचा रकाना गहाळ केल्यामुळे भविष्यात हा समाज अनेक कल्याणकारी योजनांपासून वंचित राहण्याची भीती आहे. त्यामुळे कुणबी समाजाने आता एकत्र येऊन जातीनिहाय जनगणनेचा ठराव पारित करावा आणि आपल्या हक्कासाठी लढा द्यावा. तसेच शेतीतील वाढत्या अडचणींवर भाष्य करताना पटोले यांनी तरुणांना मोलाचा सल्ला दिला. 'शेतीची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. अशा स्थितीत समाजातील सुशिक्षित तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता औद्योगिक क्षेत्रात पाऊल टाकून स्वावलंबी बनावे,' असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी कार्यक्रमाचे मार्गदर्शक ऋषभ राऊत यांनी समाजाला संत तुकाराम महाराजांचे विचाराचे महत्त्व आपल्या मनोगतातून अधोरेखीत केले. प्रसंगी नवनिर्वाचित नगराध्यक्ष योगेश मिसार यांनी सत्काराला उत्तर देतांना, आपण सदैव समाजाचे ऋणी राहणार असून, समाजाला सर्वोत्तपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ऋषीजी राऊत यांनी समाजाच्या जडणघडणीत नवीन पिढीने योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. दामोधर शिंगाडे यांनी केले, प्रस्तावना अनिल दोनाडकर यांनी मांडली, तर आभार अविनाश राऊत यांनी मानले.


Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404